Indian Streams Research Journal
ISSN 2230-7850
Impact Factor : 3.1560(UIF)
Volume-5 | Issue-1 | Feb-2015
Available online at www.isrj.org

# 18 वे सार्क शिखर संमेलन : एक अभ्यास

*पांडुरंग भिमराव बर्वे*

प्रबंधक, बहिर्जी स्मारक महाविद्यालय, वसमतनगर जि. हिंगोली.

***सारांश :–*** सार्कचे १८ वे संमेलन नेपाळची राजधानी काठमांडू येथे दि. २६ व २७ नोव्हेंबर २०१४ रोजी संपन्न झाले. संमेलनाचे ब्रीद वाक्य होते, 'शांतता आणि समृध्दीसाठी सखोल एकत्रीकरण'. सार्क देशांचे सर्व सातही राष्ट्र प्रमुख संमेलनाला उपस्थित होते. संमेलनात एकमेकांना सहकार्य करण्यासाठी करार करण्यात आले.

प्रस्तावना :-

दक्षिण आशियायी प्रादेशिक संघटना निर्माण करण्याचा विचार बांग्लादेशाचे तत्कालीन राष्ट्रपती जिया-उर-रहमान यांनी मांडला. डिसेंबर ७ आणि ८, १९८५ साली बांग्लादेशाची राजधानी ढाका येथे 'सार्क' ची मुहूर्तमेढ रोवली गेली. दक्षिण आशियाई उपखंडातील देशांचा समुह अशी सार्कची ओळख सांगता येईल. यामध्ये भारत, पाकिस्तान, श्रीलंका, बांगलादेश, नेपाळ, भूतान व मालदिव ही राष्ट्रे होती. सन २००७ मध्ये यात आफगाणिस्तान हे आठवे सदस्य राष्ट्र सहभागी झाले. अशा प्रकारे सार्कची उभारणी झाली.

***अभ्यास विषयाचे स्वरूप :–***

सार्कच्या घटनात्मक रचनेमध्ये स्थायी सदस्य देशांच्या राष्ट्रप्रमुखांच्या व्दिवार्षिक बैठकांचा अतर्भाव आहे. त्यानंतर सदस्य राष्ट्रांच्या परराष्ट्र मंत्रीस्तरीय बैठकांना स्थान आहे. त्यांनतर सचिव स्तरीय बैठकींचे आयोजन केले जाते. आजपर्यंत सार्कच्या १८ बैठका संपन्न झाल्या असुन, यातील सार्कच्या १८ व्या शिखर संमेलनाचा आढावा घेण्याचा प्रयत्न प्रस्तुत संशोधनात करण्यात आला आहे.

अभ्यास विषयाचे महत्व :-

सार्कचे १८ वे शिखर संमेलन नेपाळमध्ये पार पडले. हे शिखर संम्मेलन यशस्वी झाले की अपयशी ठरले? तसेच यामध्ये कोणकोणते ठराव झाले? तसेच संमेलनातील भारताच्या भुमिकेचा अभ्यास करून सार्कच्या यशस्वीतेसाठी काही शिफारशी सुचविण्यात आल्या आहेत.

***अध्ययन पध्दती :–***

प्रस्तुत संशोधनासाठी विश्लेषणात्मक व वर्णनात्मक पध्दतीचा अवलंब करण्यात येवून संशोधन कार्य करण्यात आले आहे.

***अध्ययन व्याप्ती :–***

दि. २६, २७ नोव्हेंबर २०१४ रोजी नेपाळची राजधानी काठमांडू येथे संपन्न झालेल्या सार्कच्या १८ व्या शिखर संमेलनाचा अभ्यास करण्यात आला आहे.

*तथ्य संकलन :–*

संकेतस्थळ, वर्तमानपत्रे, मासिके, क्रमिक पुस्तके इ. व्दित्तीयक स्त्रोतांच्या माध्यमातून तथ्ये संकलीत करण्यात आलेली आहेत.

*18 वे सार्क संमेलनातील करार :–*

सार्कमध्ये सहमतीने करार करण्याची पध्दत आहे. एकाही सदस्यांनी विरोध केला तरी करार होत नाही. या संमेलनात प्रामुख्याने खालील विषयावर करार करण्यात आले.

१.ऊर्जा क्षेत्रात परस्परांना सहकार्य करण्याबरोबरच सगळयांनाच सोयीस्कार होईल असे क्षेत्रीय पॉवर ग्रीड तयार करण्याच्या मुदयावर एकमत झाले.
२.परस्परांच्या देशातील नागरिकांना अधिकाधिक एकत्र आणण्यासाठी तसेच आर्थिक व्यवहारांना गती देण्यासाठी आवश्यक असलेला मोटार वाहन व रेल्वे कराराला अंतिम स्वरूप देण्यात सार्क देशांना अपयश आले. या करारा संदर्भात आवश्यक असलेल्या महत्वाच्या अंतर्गत प्रक्रिया पूर्ण झाल्या नसल्याचे कारण पुढे करत पाकिस्तानने या करारांना विरोध केला.
३.चीन हा सार्कचा दर्शक सदस्य आहे, पूर्ण सदस्य नाही. हा दर्जा बदलून चीनला पूर्ण सदस्य करून घ्यावे, यासाठी पाकिस्तानने पुढाकार घेतला परंतु अशा प्रकारचा प्रस्ताव भारताच्या नापसंतीमुळे नाकारला गेला.
४.पुढील वर्षी लिमा (नेरू देशाची राजधानी) येथे जागतिक पर्यावरण विषयक बैठकीमध्ये सार्क देशांची एकत्रित भूमिका असेल. हवामान बदलविषयक जागतिक बैठकांना सार्क देश एकत्रितपणे सामोरे जातील.
५.सन २०१६ मधील सार्क परीषदेचे यजमानपद पाकिस्तान कडे राहिल असे ठरले.

*सार्क संमेलनात भारताची भुमिका :–*

भारतान एकतर्फी पध्दतीनं सार्क देशांसाठी काही गोष्टीचं वचन दिलं आहे. व्यापार, आरोग्यरक्षण, शिक्षण इत्यादी गोष्टीसाठी भारतात येऊ इच्छिणाऱ्यांना उदार हस्ते व्हिसा दिला जाणार आहे. एचआयव्ही, टीबी इत्यादी छळणाऱ्या रोगांवर संशोधन व्हावं, उपचार आणि औषधं विकसित व्हावीत, यासाठी भारत एक प्रयोगशाळा उभारणार आहे. सार्क देशांशी भारताचा व्यापार आहे. त्यात भारतीय माल ज्या देशांत जास्त खपतो, त्या देशातल्या मालाला भारतात कमी वाव आहे, ही व्यापाराची दिशा इतर देशांच्या हितावह करण्याची तयारी भारतानं दाखवली आहे. म्हणजे असं की, त्या देशातल्या मालाला भारतात अधिक वाव दिला जाणार आहे. भारत एक उपग्रह सोडणार आहे. त्याचा उपयोग सार्क देशांना शिक्षण, संशोधन, आरोग्यव्यवस्था, हवामान, दळणवळण आदीसंदर्भात घेता येईल. रस्ते, वीज याबाबतही सदस्य देशांशी करार करायला भारत उत्सुक असेल, असं भारताच्या बाजून सांगण्यात आलं आहे.

*निष्कर्ष :–*

सार्कच्या काठमांडू येथील १८ व्या शिखर संमेलनाच्या अभ्यासाची निष्कर्ष खालील प्रमाणे आहेत.

१.ऊर्जा या एकाच विषयावर सार्क देशांनी आपापसात सहकार्य करावं, या विषयावरचा एक ठराव होऊन सार्क परिषद संपली.
२.पाकिस्तानच्या भुमिकेमुळं फार मोठे करार होऊ शकले नाहीत.
३.भारत आणि पाकिस्तान या दोन राष्ट्रातील संघर्ष, हे संमेलनाच्या अपयशाचे प्रमुख कारण आहे.
४.सार्कमध्ये कायमस्वरूपी सदस्यत्व मिळविण्यासाठी चीन आग्रही दिसुन आला. भविष्यात भारत-चीन स्पर्धेचं दर्शन घडेल.
५.पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी परिषदेतल्या भाषणात, भारत या संघटनेत महत्वाची भूमिका बजावू इच्छितो, असे स्पष्ट केले व एकतर्फी सहकार्याचे वचन दिले.

*शिफारशी :–*

सार्कच्या यशस्वीतेसाठी खालील प्रमाणे काही शिफारशी सुचविण्यात आलेल्या आहेत.

१.सार्क गटातील देशांनी केवळ भौगोलिकदृष्टया जवळ असुन भागणार नाही, तर एकमेकांच्या सोबतीनं त्यांनी वाटचाल केली पाहिजे.
२.अनुभव आणि तंत्रज्ञानाचे आदान प्रदान केले तर उत्पादन वाढेल व ते स्वावलंबी बनतील.
३.सार्कमध्ये कायमस्वरूपी सदस्यत्व मिळविण्यासाठी चीन आग्रही असला तरी सार्कच्या विस्ताराआधी सदस्य देशांमध्ये सहकार्य आणखी व्यापक करावे.
४.सार्कमध्ये पाकिस्तानने आपली भुमिका बदलली पाहिजे.

***समारोप :–***

ध्येयवादी हेतू ठेवून आशियातल्या देशांनी एकत्र येऊन आपापले प्रश्न सोडवावेत, सहकार्यानं विकास साधावा, असा हेतू स्थापनेमागं होता. परिषदेमध्ये एकत्र येऊन सहमतीनं, एकमतानं करार करावेत, असं सार्कन ठरवलं. त्यावेळी एक गुलाबी वातावरण होतं. सार्क परिषदा भरवाव्यात आणि त्यात सदस्य देशांनी एकत्रितपणे, एकमतानं निर्णय घ्यावेत, असं ठरलं. काळ पुढं सरकला, परिस्थिती बदलत गेली. गुलाबी वातावरण विरलं. सहमतीनं, एकमानं निर्णय घेण्याऐवजी ज्यांचचं जमतं त्यांनी एकत्रितपणे आपापले स्वतंत्र करार करावेत, असं देशांना वाटलं. नुकत्याच पार पडलेल्या काठमांडू परिषदेत तेच घडलं. हे नवं वळण हे या परिषदेच वैशिष्टय मानता येईल.

***संदर्भ ग्रंथ :–***

१.http://mr.wikipedia.org
२.दै. सकाळ, निळु दामली यांची मुखपृष्ठकथा, नोव्हेंबर २०१४
३.दै. लोकसत्ता, दि. २८ नोव्हेंबर २०१४
४.दै. सकाळ, दि. २६ नोंव्हेबर २०१४
५.स्पर्धा परीक्षा तयारी (मासिक), चाणक्य मंडल परिवार, जानेवारी २०१५









***पांडुरंग भिमराव बर्वे***
प्रबंधक, बहिर्जी स्मारक महाविद्यालय, वसमतनगर जि. हिंगोली.

